## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची गुरुवार दि. २० ऑगस्ट २००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची १२० वी बैठक गुरुवार दि. २० ऑगस्ट २००९ रोजी ३.०० वा. गृहनिर्माण भवनातील तिसऱ्या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृहात संपन्न झाली. सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) | मा. आमदार श्री. सचिन अहिर | सभापती |
| २) | मा. श्री. सुभाष हजारे, भा.प्र.से. | उप सभापती तथा मुख्य अधिकारी |
| ३) | मा. श्री. गजेंद्र लष्करी | सदस्य |
| ४) | मा. श्री. नंदकुमार काळे | सदस्य |
| ५) | मा. श्री. कमरुद्दीन मर्चंट | सदस्य |
| ६) | मा. श्री. किसन बा. जाधव | सदस्य |
| ७) | मा. श्रीमती सुरेखा पाटील | सदस्या |
| ८) | मा. श्री. हेमराज शहा | सदस्य |
| ९) | मा. श्री. सईद खान | सदस्य |
| १०) | मा. श्री. हरिष सणस | सदस्य |
| ११) | मा. श्रीमती उल्का पाटकर | सदस्या |
| १२) | मा. श्री. शरद शिरीषकर | सदस्य |
| १३) | मा. श्री. व्ही. जी. नायर | सदस्य |
| १४) | मा. श्री. तारिक फारुकी | सदस्य |
| १५) | मा. श्री. सुबोध बांदिवडेकर | सदस्य |
| १६) | उपकर निर्धारक व संकलक, म.न.पा. | निमंत्रक |
| १७) | श्री. अनिल देशमुख, निवासी कार्यकारी अभियंता | सचिव |

बैठकीच्या सुरुवातीस सचिव यांनी उपस्थित मा. सभापती, मा. उपसभापती व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत करुन मा. सभापती यांच्या परवानगीने बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

**बाब क्रमांक - १२०.१**

विषय - दि. १२/०८/०९ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मागील बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र. १ ते ११ वर सादर करण्यात आले.

सदर कार्यवृत्तांतावर चर्चा होत असताना सन्मा. सदस्य श्री. किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे मा. उपसभापती तथा मुख्य अधिकारी व मा. सभापती यांचेहस्ते भूमिपुजन करण्याचा कार्यक्रम घेण्यात यावा, असे सूचविले. यावर मा. सभापती यांनी असे सांगितले की, मोतीवाणी चाळ समितीच्या रहिवाश्यांनी स्वतःहून उप मुख्यमंत्री साहेबांची वेळ

घेतली आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांचा वेळ घेण्याचा प्रयत्न चालू आहे. जर शक्य झाले नाहीतर मा.उप मुख्यमंत्री महोदयांचे हस्ते मा.सभापती, सन्मा.सदस्य तसेच स्थानिक लोक प्रतिनिधी यांचे उपस्थितीत भूमीपूजनाचा व चाव्या वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.२ वरील परिच्छेद क्र.३ मध्ये सन्मा. सदस्य श्री.लष्करी यांनी सं.शि.तील गाळे कोणाला वितरीत केले आहेत, त्यांची नावे व फोटो इ.माहिती ज्या ठिकाणी संक्रमण शिबीरात म्हाडाची कार्यालये आहेत अशा ठिकाणच्या संक्रमण शिबीरात प्रथम लावण्याबाबत मागील बैठकीत सूचना केली होती असा बदल कार्यवृत्तांतात करण्यात यावा व त्याप्रमाणे कार्यवृत्तांतात सुधारणा करावी असे ठरले. त्या नंतर सन्मा.सदस्य.श्री.किसन जाधव यांनी लॅमीनेटेड व्हेकेशन नोटीसबाबत काय कार्यवाही केली अशी विचारणा केली असता, यासंदर्भात सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, या बाबत दुरुस्ती विभागातून कार्यकारी अभियंता यांचेकडून सूचना आलेल्या आहेत. त्या नुसार त्या मधील मजकूर अंतीम करण्यात येईल. तसेच हे परमनन्ट डॉक्युमेंट असल्याभुळे त्याला थोडावेळ लागत आहे.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी कार्यवृत्तांतातील पान क्र.३ वरील परिच्छेद क्र.४ मध्ये नमूद केल्याप्रभाणे इ.क्र.४८-५० स्लेटर रोडबाबत पुढे काय कार्यवाही झाली अशी विचारणा केली असता, मा.मुख्य अधिकारी यांनी उपमुख्य अभियंता (द.) यांना इमारतीची पहाणी करुन योग्य तो निर्णय लवकरात लवकर घ्यावा असे पुन्हा आदेश दिले.

मागील बैठकीत सी विभागातील दुरुस्तींच्या कामांना म.न.पाचे विभाग अधिकारी यांचेकडून स्थगिती देण्यात येते, ते योग्य नाही. अशा बाबतच्या आयत्या वेळच्या विषयावर सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी मुद्दा उपस्थित करुन चर्चा केली होती. ती बाब कार्यवृत्तांतामध्ये अंतर्भूत नाही असे सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी नमूद केले. या विषयाचा अंतर्भाव करण्यात यावा, असे ठरले. त्या संदर्भात उपमुख्य अभियंता (द.) यांनी संबंधित म.न.पा.विभाग अधिकारी यांचेसोबत बैठक घेवून म.न.पा.ने दुरुस्ती कामांना अशा प्रकारे स्थगिती देऊ नये, असे त्यांना स्पष्ट करणे गरजेचे आहे व बंद कामे सुरु करावीत, विशेषकरुन इ.क्र.३-अे ताकवाडी या इमारतीचे काम म.न.पा.ने थांबविले असून, ते सुरु करण्याकरीता त्वरित कार्यवाही व्हावी, असे ठरले. या बाबत मा.सभापती यांनी देखील असे नमूद केले की, म.न.पा.कडून सहकार्य मिळणे आवश्यक आहे. उपमुख्य अभियंता (द.) यांनी वॉर्ड ऑफीसरसोबत त्वरित बैठक घेऊन पुढील योग्य ती कार्यवाही करावी व त्यानुसार कार्यवृत्तांतात वरीलप्रमाणे बदल करुन कार्यवृत्तांत स्थायी करण्याचे ठरले.

सन्मा.सदस्य श्री.किसन जाधव यांनी भाडेवसुली बँकेमार्फत सुरु करण्याबाबत लवकर कार्यवाही करावी, असे सूचित केले. या बाबत मा.सभापती यांनीदेखील याबाबत लवकर कार्यवाही व्हावी असे सांगितले.

तसेच पृ.क्र.५ वरील **ठराव क्रमांक - ११९/९९४** मध्ये ४१ कामांचा अंतर्भात नजरचुकीने राहून गेल्यामुळे सदर ठरावामध्ये मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण ६३ + ४१ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.११,९९,९६,७७०/- + रु.५,३०,८७,६९०/-एवढया रकमेच्या

अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.६,१९,७३,९६२/- + रु.४,१६,३४,९६१/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली, अशी कार्यवृत्तांतात सुधारणा करण्यात यावी अशी सचिव/दुवपु.मंडळ यांनी बैठकीत विनंती केली व त्यानुसार बदल करण्यास सर्वानुमते संमती दिली.

मा. सभापती श्री. सचिनभाऊ अहिर यांनी असे कळविले की, त्यांचे मतदार संघातील मागील बैठकीतील "ॐ साई" इमारतीकरिता रु. १.५० लक्ष रक्कमेच्या कामाला प्रशासकीय मंजूरी देण्यांत आली होती. सदर काम रद्द करुन "आमची सावली" या पुनर्रचित इमारतीचे दुरुस्तीकरिता प्रशासकीय मंजूरी द्यावी. तसेच मागील बैठकीतील बाब क्र. ११९.१० (१) मधील मंजूरी दिलेल्या कामांपैकी अ. क्र. २४ खेमजी नागजी चाळ क्र. २ व अ. क्र. (३०) मधील १२६ निळकंठेश्वर, ॲनी बेझंट रोड या प्रत्येकी रु.१.५० लक्ष रक्कमेची कामे रद्द करुन त्याऐवजी "झोडिया मेन्शन" सेनापती बापट मार्ग या उपकरप्राप्त इमारतीचे दुरुस्तीकरिता रु. ३.०० लक्ष इतक्या रक्कमेच्या कामास सर्वानुमते मंजूरी दिली. सदर बदलास एकमताने मान्यता दिली व कार्यवृत्तांतामध्ये त्याप्रमाणे बदल करण्याचे ठरले.

वरीलप्रमाणे सविस्तर चर्चेअंती दि.१२/०८/०९ रोजी झालेल्या ११९ व्या बैठकीचे कार्यवृत्तांत स्थायी करण्यात आले.

<u>आयत्यावेळेचे विषय -</u>

**बाब क्रमांक - १२०.२ (१)**

विषय - दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.१३ ते १९ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१००५**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण ३७ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७,८२,१५,५०१/-(रुपये सात कोटी ब्याऐंशी लक्ष पंधरा हजार पाचशे एक फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.४,४०,१४,३६२/- (रुपये चार कोटी चाळीस लक्ष चौदा हजार, तीनशे बासष्ट फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.२ (२)**

विषय - दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.२१ ते २३ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१००६**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "ब" नुसार एकूण १५ उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.२,५८,००,१५२/-(रुपये दोन कोटी अठ्ठावन्न लक्ष,एकशे बावन्न फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.१,४२,१७,७३९/- (रुपये एक कोटी बेचाळीस लक्ष सतरा हजार, सातशे एकोणचाळीस फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.३**

विषय - उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्ती कामांच्या मुळ/सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे प्रस्ताव.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.२५ ते ३७ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१००७**

मुंबई शहर बेटावरील जुन्या मोडकळीस आलेल्या उपकरप्राप्त इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी परिशिष्ट "अ" नुसार एकूण ३० उपकरपात्र इमारतींच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या कामासाठी रु.७,१६,६२,९३०/-(रुपये सात कोटी सोळा लक्ष, बासष्ट हजार नऊशे तीस फक्त)एवढया रकमेच्या अंदाजपत्रकांना निव्वळ टप्प्याची रक्कम रु.३,५१,६३,६४९/- (रुपये तीन कोटी एकाव्वन्न लक्ष त्र्येसष्ट हजार, सहाशे एकोणपन्नास फक्त) इतक्या रक्कमेस सर्वानुमते प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.४**

विषय - इ.क्र.३६ एल, मुगभाट क्रॉस लेन, परकर भवन, गिरगाव, मुंबई- ०४
म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देणेबाबत.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.३९ ते ४१ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१००८**

इ.क्र.३६ एल, मुगभाट क्रॉस लेन, परकर भवन, गिरगाव, मुंबई- ०४ म्हाड अधिनियम १९७६ कलम ८८ (३) (अ) चे प्रमाणपत्र देणेबाबत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.५ (१)**

विषय - रु.२०००/- प्रती चौ.मी.ची मान्यता देण्याबाबत.
४१-४३, चौपाटी सी-फेस रोड.

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.४३ ते ४७ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१००९**

४१-४३, चौपाटी सी-फेस रोडच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.५ (२)**

विषय - रु.२०००/- प्रती चौ.मी.ची मान्यता देण्याबाबत.
इ.क्र.६, बोरा मस्जिद स्ट्रीट

सदर प्रस्ताव पृष्ठ क्र.४९ ते ५३ वर सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१०१०**

इ.क्र.६, बोरा मस्जिद स्ट्रीटच्या दुरुस्तीबाबत रु.२०००/- प्रती चौ.मी.च्या मर्यादेत सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.६**

विषय - विशेष निधी अंतर्गत मा.आमदार यांच्या मतदार संघात करावयाच्या कामांच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

१. मा.आमदार श्री.अरविंद नेरकर - ऑपेरा हाऊस मतदार संघ

२. मा.आमदार श्री.राज के.पुरोहीत - मुंबादेवी मतदार संघ

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र.     ते      वर प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आले आहेत.

चर्चेअंती विशेष निधी अंतर्गत मा.आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीच्या आधीन राहून (प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करावी, असे सर्वानुमते ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१०११**

विशेष निधी अंतर्गत मा.आमदार महोदयांच्या मतदारसंघात करावयाच्या कामांच्या अंदाजपत्रकांना उपलब्ध निधीच्या आधीन राहून (प्रत्येक प्रस्तावांसोबत जोडलेल्या परिशिष्ट-ब मध्ये दर्शविलेल्या कामांच्या अंदाजपत्रकीय रक्कमेस) प्रशासकीय मान्यता देण्याचे तसेच ठराव स्थायी होण्याची वाट न पाहता पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**बाब क्रमांक - १२०.७**

विषय - **पुनर्विकास**

मुंबई बेटावरील अ वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाकरीता ना हकरत प्रमाणपत्र देण्याबाबतचे प्रस्ताव.

१. भूकर पहाणी क्र.५० माझगांव विभाग,इ.क्र.४-६, डोलकर स्ट्रीट आणि हॉस्पीटल ने, माझगांव, मुंबई-१० येथील बॉब बंगलो.

२. भूकर पहाणी क्र.११०१-भायखळा विभाग,इ.क्र.२९-३१,खांडिया स्ट्रीट, भायखळा,मुंबई

३. भूकर पहाणी क्र.९/६३९,गिरगांव विभाग, इ.क्र. १३४ एल,व्ही.पी.रोड येथील गिरगांव, मुंबई सिक्का नगर,एन ब्लॉक.

४. भूकर पहाणी क्र.१९४४, १/१९४४, ३/१९४४ आणि ५/१९४४ भायखळा विभाग, इ.क्र.६१६-ए ते ६१६-आय, ६१६-के ते ६१६-पी व ६१८-६२०, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई- ४०० ०२७, लक्ष्मी बिल्डींग.

उपरोक्त प्रस्ताव पृष्ठ क्र. ते वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत, सदर प्रस्तावांवर चर्चा झाली. चर्चेअंती सर्वानुमते मान्यता देण्याचे ठरले.

**ठराव क्रमांक - १२०/१०१२**

मुंबई बेटावरील खालील ४ मालमत्तांवरील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाचे प्रस्तावांत नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून ना हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भूकर पहाणी क्र.५० माझगांव विभाग,इ.क्र.४-६, डोलकर स्ट्रीट आणि हॉस्पीटल ने, माझगांव, मुंबई-१० येथील बॉब बंगलो.

२. भूकर पहाणी क्र.११०१-भायखळा विभाग,इ.क्र.२९-३१,खांडिया स्ट्रीट, भायखळा,मुंबई

३. भूकर पहाणी क्र.९/६३९,गिरगांव विभाग, इ.क्र. १३४ एल,व्ही.पी.रोड येथील गिरगांव, मुंबई सिक्का नगर,एन ब्लॉक

४. भूकर पहाणी क्र.१९४४, १/१९४४, ३/१९४४ आणि ५/१९४४ भायखळा विभाग, इ.क्र.६१६-ए ते ६१६-आय, ६१६-के ते ६१६-पी व ६१८-६२०, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई- ४०० ०२७, लक्ष्मी बिल्डींग.

बैठकीच्या अखेरीस, ही बैठक येत्या विधानसभा निवडणूक आचारसंहितेच्या आधीची बैठक असल्याने मा.सभापती श्री.सचिनभाऊ अहीर यांनी आपले मनोगत व्यक्ती केले. त्यांनी आपले विचार मांडताना असे सांगितले की, गेली २ ते ३ वर्षामध्ये दुरुस्ती मंडळाच्या माध्यमातून चांगले काम आपण सर्वांनी केलेले आहे. आपल्या सर्वांच्या कार्यकालावधीत धोरणात्मक निर्णय झालेले आहेत. भविष्य काळात या निर्णयांचा भाडेकरुंना चांगल्याप्रकारे उपयोग होईल. झोपडपट्टीत रहाणारे रहिवासी आणि जुन्या इमारतीत रहाणारे भाडेकरु यांच्यात तफावत करण्यात आपण यशस्वी झालेलो आहोत. तसेच भाडेकरुंना ३०० चौ.फूटाचे गाळे देण्याबाबत आपण यशस्वी झालेलो आहोत. रु.१२००/- ची मर्यादा रु.२०००/- पर्यंत वाढविण्यातही आपण यशस्वी झालेलो आहोत.किमान १०० ते १२५ इमारती त्याच जागेवर उभ्या

करण्यात, तसेच त्यांची दुरुस्ती व पुनर्बांधणी मोठया प्रमाणावर करण्याचे काम आपण आपल्या कालावधीत केलेले आहे. मोठया प्रमाणावरती संक्रमण शिबीरांची पुनर्बांधणी करण्याचे काम आपण केलेले आहे. उपकरप्राप्त इमारतींचे पुनर्विकासाकरिता विकास नियंत्रण नियमावलीत सुधारणा करुन सुधारित वि.नि.नि.३३ (७) व ३३ (९) शासनाकडून मंजूर करुन घेण्याचे काम मंडळाने केले आहे. वि.नि.नि.३३ (९) खाली क्लस्टर डेव्हलपमेंट यापुढे होणार आहे, याचे श्रेय देखील मंडळाचे आहे. पूर्णपणे काम संगणीकृत करण्यातही आपण यशस्वी झालेलो आहोत. सुदैवाने या पावसाळयामध्ये या वर्षी मनुष्यहानी झालेली नाही. त्यासाठी सर्व अधिका-यांचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले. तसेच त्यांनी पुढे असेही सांगितले की, आपण घेतलेल्या धोरणात्मक निर्णयांना प्राधिकरणानेही वेळोवेळी मान्यता दिलेली आहे. प्रत्येक सभासद राजकीय सामाजिक बांधिलकी ठेवून येथे आलेला आहे व त्यांनी त्याप्रमाणे काम करुन हेतू साध्य करण्यामध्ये यश प्राप्त केलेले आहे. भविष्य काळामध्ये या सर्व गोष्टींचा उपयोग त्यांना त्यांच्या विभागामध्ये काम करताना होणार आहे. सर्व सन्मा.सदस्यांच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाला शुभेच्छा दिल्या. तसेच जे जे मंडळाला मुख्य अधिकारी लाभले त्या सर्वांचे फार मोठे सहकार्य लाभले आहे, असे मा.सभापती यांनी आपले मत व्यक्त केले. तसेच सध्याचे मुख्य अधिकारी यांनी नकारात्मक भूमिका कधीही ठेवली नाही, नेहमी सकारात्मक निर्णय घेतले, असे नमूद करुन मा.सभापती यांनी मुख्य अधिकारी श्री.सुभाष हजारे यांचे अभिनंदन केले. तसेच सहमुख्य अधिकारी श्री.काळमपाटील यांचे कमित कमी वेळेत फार मोठे सहकार्य मंडळाला लाभले आहे तसेच इतर अधिकारी व कर्मचारी यांचेदेखील चांगल्याप्रकारे सहकार्य लाभले, असाही त्यांनी आर्वजून उल्लेख केला. तसेच सहकार्याबद्दल मा.सभापती यांनी सर्व सन्मा. सदस्य व अधिका-याचें बैठकीत आभार मानले.

शेवटी मा.मुख्य अधिकारी यांनी आपले मनोगत व्यक्त करताना असे सांगितले की,एकंदरीत खेळीमेळीच्या वातावरणात सर्व बैठका झाल्या. अत्यंत सकारात्मक भूमिका आपण सर्व सदस्यांनी प्रत्येकवेळी घेतलेली आहे. प्रशासनाला अडचणीत आणणे असे कधीही आढळून आलेले नाही. सतत सहकार्यच केलेले आहे. असे मत व्यक्त करुन प्रशासनाच्यावतीने मा.उप सभापती तथा मुख्य अधिकारी यांनी मा.सभापती श्री.सचीनभाऊ अहिर व सर्व सन्माननीय सदस्यांचे मनःपूर्वक आभार मानले. यापुढे देखील एकमेकांना सहकार्य मिळेल असे मत व्यक्त केले व सर्वांना धन्यवाद देऊन शुभेच्छा दिल्या.

बैठकीच्या अखेरीस मा.सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्य व अधिका-यांचे आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले.

सचिव तथा नि.का.अ./दु.व पु.मंडळ

मा.उपसभापती तथा मुख्य अधिकारी/दुवपु.मंडळ

मा.सभापती,मुं.इ.दु.व पु.मंडळ.